# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. १५९-२३** **दिनांक :- १७/०५/२०२३**

## गावठी हातभट्टीची दारु तयार करणा-या दोन अड्ड्यावर गुन्हे शाखा कक्ष ३, विरार यांची कारवाई.

**-------00000-------**

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील अवैद्य व्यवसायांवर प्रभावीपणे कारवाई करणेबात वरिष्ठांनी वेळोवेळी मार्गदर्शन व आदेशित केले होते.

दिनांक १७/०५/२०२३ रोजी गुन्हे शाखा कक्ष ३, विरार युनिटचे अधिकारी व अंमलदार यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली कि, पहाटे ०५.२० वाजेच्या सुमारास बरफ पाडा खंडी विरार पुर्व हद्दीतील जंगलात डोंगराचे पायथ्याशी बेकायदेशीर रित्या गावठी हातभट्टीची दारु तयार होत आहे. मिळालेल्या माहितीचे अनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष ३, विरार युनिटचे अधिकारी व अमलदार यांनी कायदेशीर बार्बीची पुर्तता करुन स्टाफसह वर नमुद ठिकाणी छापा कारवाई करतेवेळी सदर ठिकाणी हजर असणारी ०१ अनोळखी महिला व ०३ अरोपीत हे पोलीस पथकाची चाहुल लागल्याने सदर ठिकाणावरुन पळुन गेले. सदर कारवाईमध्ये १) दोन ॲल्युमिनीयम धातुचे थाळीचा टाव (सतेले) व दोन ॲल्युमिनीयमच्या नळी असलेले चाटु, २) २०० लिटर क्षमतेचे २० निळया रंगाचे प्लाटीचे ड्रम तसेच २० लिटर क्षमचेचे सफेद रंगाचे १० प्लास्टीकचे कॅन त्यात एकूण ४२०० लिटर नवसागर गुळ मिश्रीत वॉश, ३) २० लिटर क्षमतेचे २ सफेद रंगाचे प्लास्टीकचे कॅन त्यात २० लिटर गैर कायदा गावठी हातभट्टीची दारु व दारु तयार करण्याची साधने असा एकुण ०२,१६,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला असुन सदर मुद्देमालापैकी तपासकामी ६,०००/- रुपये किंमतीची गावठी दारु व दारु बनविण्यासाठी वापरण्यात आलेले साहित्य सोडुन इतर मुद्देमाल जागेवर नष्ट करण्यात आला आहे. सदर प्रकरणी ०१ अनोळखी महिला व ०३ पुरुष आरोपीतांविरुध्द पो.हवा.मुकेश रामचंद्र तटकरे नेमणुक गुन्हे शाखा कक्ष ३, विरार यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन विरार पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. ४९१ /२०२३ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ब) (क) (ड) (फ) (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष ३, विरार युनिटचे पो.नि. श्री. प्रमोद बडाख, पो.उप.नि. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. मुकेश तटकरे, शंकर शिंदे, अश्विन पाटील, पो.अंम. सुमित जाधव, म.सु.ब. गणेश यादव, प्रविण वानखेडे, सागर सोनवणे, यांनी केली आहे.





--------ooo--------